क्रमांक-आस्था/५६५७/१४
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
३ रा मजला, धर्मादाय आयुक्त भवन,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दिनांक - 08 DEC 2014

परिपत्रक क्रमांक ४०५ दिनांक ०८/१२/२०१४

या आदेशाद्वारे धर्मादाय संघटनेतील सर्व स्विय सहायक, लघुलेखक (उ. श्रेणी), लघुलेखक (क. श्रे.) व लघुटंकलेखक यांना कळविण्यात येते की, त्यांनी रजेवर जाण्यापूर्वी रजेच्या अर्जावर संबंधित अधिका-याकडून मंजूरी घ्यावी. तसेच सर्व कर्मचा-यांना कळविण्यात येते की, त्यांनी रजेवर जाण्यापूर्वी अधिक्षक अथवा संबंधित अधिका-यांची परवानगी घ्यावी व नंतरच रजेवर जावे. वैदयकीय अथवा तातडीच्या कारणासाठी अचानक रजेवर जातेवेळी याची सूचना संबंधित अधिकारी अथवा अधिक्षक यांना दूरध्वनीद्वारे दयावी.

सर्व अधिक्षकांना कळविण्यात येते की, त्यांच्या शाखेत काम करणा-या कर्मचा-याने रजा उपभोगल्यानंतर रजेचा अर्ज सादर केल्यावर सदर रजेबाबत त्यांना पूर्वसूचना दिली किंवा नाही हे कर्मचा-यांच्या रजेच्या अर्जावर नोंदवावे. जे कर्मचारी रजेची पूर्वसूचना न देता रजेवर जातील त्यांची रजा विनावेतन करण्यात येईल, याची सर्व कर्मचा-यांनी नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत** :-

१. कार्यालयीन आदेश धारिणी.
२. धर्मादाय सह आयुक्त, मुख्यालय/ बृहन्मुंबई
३. धर्मादाय उप आयुक्त, मुख्यालय/बृहन्मुंबई
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त, मुख्यालय/ बृहन्मुंबई
५. जन संपर्क अधिकारी /अधिक्षक, मुख्यालय/बृहन्मुंबई
६. निवड नस्ती.